**चौकशी अर्ज क्रमांक १/२०१८ मधील निशाणी १ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा यांच्या पत्नी व मुलांनी मुंबई प्रांतिक अधिनियम १८२७ चे प्रकरण VIII (Chapter I & II) प्रमाणे वारस दाखला मिळणेकामी दाखल केला आहे.

अर्जदार यांच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :—

२. अर्जदार क्र.१ ही मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा यांची पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ ही मुले आहेत. मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा हे दिनांक १४/१२/२०१७ रोजी मरण पावले. मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा हे विनामृत्युपत्र मरण पावले. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा यांचे कायदेशीर वारस आहे. मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा यांच्या नांवे अर्जात नमूद केल्याप्रमाणे अपार्टमेंट नं. व्हीएस३/१९/०—२, तळमजला, व्हीएस३/जेएन ३टाईप, आर्शिवाद अपार्टमेंट मालक संघटना इमारत क्र. १४ ते २३, निवासी क्र.९ क्षेत्र, नवी मुंबई ही मिळकत आहे. अर्जदार क्र.१ ते ३ हे सदरचा अर्ज मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा यांचे वारसदार आहे, असा वारस दाखला मिळणेसाठी दाखल केला आहे.

३. कोकण सकाळ या वृत्तपत्रामध्ये दिनांक २०/०१/२०१८ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करुन वारस दाखला देणे संबंधी हक्क, अधिकार व हितसंबंध असलेल्यांकडून हरकती मागविण्यात आल्या. तसेच जाहिरनामा (निशाणी ५) वरुन असे दिसून येते कि, दिनांक २२/०२/२०१८ रोजी दिलेल्या पत्त्यावर जाऊन बेलिफाने जाहिरनामा प्रसिध्द केला आहे. परंतु जाहिर नोटीस व जाहिरनामा यामध्ये दिलेल्या मुदतीत कोणीही हरकतदार हजर झाले नाहीत व अर्जदारांचे वारस दाखला मिळणेबाबतच्या अर्जास हरकत घेतली नाही.

४. अर्जाचे पुष्ट्यार्थ अर्जदार क्र १ यांनी त्यांच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.७ अन्वये, अर्जदार क्र.२ यांनी नि.८ अन्वये व अर्जदार क्र. ३ यांनी नि. ९ अन्वये दाखल केले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी तोंडी

पुराव्याव्यतिरिक्त जाहीरनामा, मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा यांचा मृत्यू दाखला, साठेखत, सिडकोचे पत्र, दि. १८.०८.१९९२ रोजीचा नोंदणीकृत करार, शेअर सर्टिफिकेट व आधारकार्ड इत्यादी कागदपत्रे मुळ प्रतीवरुन तपासण्यात आलेल्या सत्यप्रती हा कागदोपत्री पुरावा सादर केला आहे. अर्जदाराच्या तोंडी व सदर कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार क्र. १ ते ३ हे या मयताचे वारस आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी निशाणी १६ अन्वये पुरसीस दाखल करून अर्जदारांनी त्याचा पुरावा संपविला. त्यामुळे अर्जदारांचा अर्ज अबाधित राहिला. म्हणून अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस दाखला मिळण्यास पात्र आहेत.

५. अर्जदार हे भारतीय वारस कायदा १९२५ कलम ३९० आणि ३७९ तसेच मुंबई प्रांतिक अधिनियमाचे कलम १ व २ अन्वये वारस दाखला मिळण्यास पात्र होतात. सदरील अर्जानुसार कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याही मिळकती संदर्भात हक्क व अधिकार ठरविण्यात येत नाहीत. नि. १५ अन्वये मुल्यांकन अहवालानुसार मिळकतीचे मूल्यांकन रू. १९,८०,०८४/— इतके आहे. त्या रकमेवर न्यायालयीन फी भरणे आवश्यक आहे. करिता, खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत श्री.एडमोंड रफेल डिसोझा यांचे कायदेशीर वारस असल्याचे मान्य(recognised) करण्यात येत आहेत.

३. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे मिळकतीबाबत योग्य न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस दाखला देण्यात यावा.

(श्रीमती शु.ज.कातकर)
दिनांक :— ०२/०३/२०१९
३ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, वाशी.